महा मेट्रो
PUNE METRO

# पुणे मेट्रो स्थानकांवर अत्याधुनिक सुविधा

**पुणे , 06 फ़ेब्रुवारी 2020:** पुणे मेट्रोचे काम दोन मार्गिकेत वेगाने चालू आहे . वनाज ते रामवाडी 15.75 किमी मार्गिका संपूर्णतः उन्नत आहे . तर पीसीएमसी ते स्वारगेट ही 17.53 किमी मार्गिका शिवाजीनगर ते स्वारगेट या भागात भूमिगत आहे . दोन्ही मार्ग़िकांची एकूण लांबी 33.28 किमी असून पूर्ण मार्गिकेवर ३१ ठिकाणी मेट्रो स्थानके उभारण्यात येणार आहे. त्यापैकी शिवाजीनगर , सिव्हिल कोर्ट , फडके हौद , मंडई ,व स्वारगेट ही स्थानके भूमिगत असणार आहे.

महामेट्रोच्या स्थानकांमध्ये अत्याधुनिक सुविधा असणार आहे . प्रवाशांना स्थानकांवर पोहचण्यासाठी लिफ्ट , एस्केलेटर व जिन्यांची व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक मेट्रो स्थानकांवर ३ ते ४ एन्ट्री, एक्सिटची व्यवस्था केली आहे. प्रत्येक मेट्रो स्थानक हे दुमजली असणार असून लेवल १ म्हणजेच कॉनकोर्स हा भाग प्रवशांना तिकिटे व इतर सुविधा साठी राखीव असणार आहे . लेवल २ या ठिकाणी मेट्रो ट्रेनचा फलाट असणार असून प्रवाशांना लेवल २ या ठिकाणी मेट्रो ट्रेन पकडता येइल . लेवल १ व तर लेवल २ यावर जाण्यासाठी जिना , लिफ्ट , एस्केलेटर ची सुविधा प्रत्येक मेट्रो स्थानकांवर असणार आहे. महामेट्रोने एकूण १२१ लिफ्ट व १६५ एस्केलेटरस बसविण्यात येणार आहे .

उन्नत मेट्रो स्थानकांवर लेवल १ किंवा कॉनकोर्स हा भाग पादचाऱ्यांना रोड एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला पादचारी पुलासारखे वापरता येणार आहे. त्यासाठी तिकीट घेण्याची आवश्यकता लागणार नाही . याव्यतिरिक्त मेट्रो स्थानकांवर प्रसाधन सुविधा प्रणाली , सूचना फलक , इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले , आणि पॅसेंजर इन्फॉरमेशन सिस्टिम , सिसिटीव्ही इत्यादी सुविधा असणार आहे.

प्रवाशांच्या सेवेसाठी ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन व ऍक्सेस कंट्रोल सिस्टिम लावली जाणार आहे . जेणेकरून मोठ्या प्रमाणावर प्रवाशांना फलाटावर विनासायास जाता येइल , कॉमन मोबिलिटी स्मार्ट कार्ड ची देखील सुविधा करण्यात येणार आहे जेणेकरून प्रवाशांना प्रत्यक्ष पैसे घेऊन जाण्याची गरज पडणार नाही .

पुणे मेट्रोची स्थानकांचे आराखड्यात पुण्याचा ऐतिहासिक ,सांस्कृतिक , औदयोगिक वारसाचे प्रतिबिंब पुणेकरांना दिसणार आहे . शिवाजी महाराजांच्या मावळा पगडी पासून प्रेरणा घेऊन डेक्कन , संभाजी उद्यान सथानकांचे आरेखन करण्यात आले आहे . पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या झाडांपासून प्रेरणा घेऊन संत तुकाराम नगर, कासारवाडी, फुगेवाडी, दोपोडी, बोपोडी व खडकी स्थानकांचे डिजाइन करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या डिझाईनला ऑरगॅनिक असे संबोधले आहे .पुणे शहराला औदयोगिक नगरी असे सुद्धा संबोधले जाते त्यामुळे मेट्रोची पीसीएमसी व भोसरी स्थानके औदयोगिक कारखान्याचे प्रेरणा घेऊन त्यांचे नकाशे बनवण्यात आले आहे. तसेच मेट्रोची .वनाज , आनंदनगर , आयडीयल कॉलनी, नळ स्टोप, गरवारे, आर टी ओ , पुणे स्थानक , रुबी

हॉल, बंड गार्ड्न, येरवडा, कल्याणीनगर, रामवाडी ही स्थानके बँड या प्रकारातील असणार आहे व त्यासाठी लागणारी त्या स्थानकांची प्रेरणा पुण्याची सर्वांगीण प्रगतीपासुन घेण्यात आली आहे.

पुणे मेट्रो आणि सर्व स्थानके इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल च्या प्लॅटिनम रेटिंग मार्गदर्शक तत्वानुसार बनविण्यात येणार आहे . त्यामुळे या स्थानकांवर कमीत कमी ऊर्जेचा वापर होणार आहे . सर्व स्थानकांवर वॉटर हार्वेस्टिंग तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे . तसेच मोठ्या प्रमाणावर विद्युत सोलर सेल देखील वापरण्यात येणार आहे त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती करण्यात येणार आहे . तसेच प्रत्येक स्टेशनला बायोडायजेस्टर तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे जेणेकरून पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बचत होईल . याप्रंसगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे कि पुणे मेट्रोची स्थानके हे जागतिक दर्जाची व पुण्याचा सांस्कृतिक , ऐतिहासिक , व औदयोगिक वारसा विचारात घेवून प्रवाशांना सुखसोयी लक्षात घेऊन करण्यात आली आहे.